महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३०४ वे | दिनांक : ०१/११/२०२६ | वार : गुरुवार

महायुतीतील वाचाळवीरांना बावनकुळेंचा इशारा; ४०० कोटींचा निधी दुष्काळासाठी वळवणार

नागपूर : "राज्यातील भीषण दुष्काळी परिस्थिती पाहता नागपूर जिल्ह्यामध्ये सिमेंट रस्ते, सुशोभीकरण किंवा जी बांधकामे दोन वर्षांनी केली तरी चालतील, अशी सर्व कामे तातडीने थांबवली जातील. जिल्हा नियोजन समितीचा (DPC) तब्बल 400 कोटी रुपयांचा संपूर्ण निधी पाणीटंचाई, विहिरींचे पुनरुज्जीवन, जलसंधारण आणि शेतरस्त्यांच्या कामांवर खर्च केला जाईल. पेंच आणि तोतलाडोह धरणातील पाण्याचे नियोजन जून 2027 पर्यंत पुरेल अशा रीतीने केले जाईल. तसेच, महसूल विभागात मोठा प्रशासकीय निर्णय घेत भूमी अभिलेख विभागातील 106 अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली असून, 5,000 परवानाधारक खासगी सर्व्हेअर्स नेमून जमिनीची मोजणी 15 दिवसांत पूर्ण करण्याचा राज्य सरकारचा संकल्प आहे," अशी महत्त्वपूर्ण घोषणा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत बावनकुळे यांनी दुष्काळ निवारणाचा आढावा, महसूल खात्यातील सुधारणा, विधान परिषद निवडणुकीतील पराभवाचे आत्मपरीक्षण, महायुतीमधील अंतर्गत वाद आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील 12 वर्षांच्या राजकीय प्रवासावर सविस्तर भाष्य केले. कॅबिनेट उपसमितीचे अध्यक्ष या नात्याने दुष्काळ निवारणाचा नागपूर जिल्ह्याचा आढावा घेताना महसूलमंत्री म्हणाले, "नागपूर जिल्ह्यामध्ये डीपीसीचा 400 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध आहे. यावर्षी सिमेंट काँक्रीटचे रस्ते, सुशोभीकरण अशी दोन वर्षे पुढे ढकलता येण्यासारखी सर्व कामे पूर्णपणे थांबवली जातील. हा संपूर्ण 400 कोटींचा निधी जलसंधारण, विहिरींचे पुनर्भरण, जलजीवन मिशनच्या अपूर्ण विहिरी व नळयोजना तातडीने पूर्ण करणे, शेतरस्ते आणि पाणीटंचाईच्या उपाययोजनांवर वळवला जाईल." "तोतलाडोह आणि पेंच धरणातील पिण्याचे पाणी जपून वापरण्यात येईल. नागपूरकरांना पिण्याच्या पाण्यासाठी शेजारील राज्यातून पाणी वा चारा आणण्याची गरज भासणार नाही, अशी भक्कमव्यवस्था केली जाईल. मात्र, ज्या ठिकाणी 100 लिटर पाणी दिले असता 35 लिटर पाणी गळती वा चोरीमध्ये वाया जाते, अशा अनधिकृत आणि व्यावसायिक पाणी वापरावर कडक नियंत्रण आणले जाईल." महसूल विभागात घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाची माहिती देताना त्यांनी सांगितले की, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिल्यानंतर महसूल विभागातील जमाबंदी आयुक्त आणि भूमी अभिलेख विभागाकडील 106 अधिकाऱ्यांना पदोन्नती व नव्या पदस्थापना देण्यात आल्या आहेत. हे सर्व अधिकारी सोमवारी रुजू होत आहेत. यामुळे विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील जमिनीच्या मोजणीचा प्रलंबित अनुशेष (बॅकलॉग) भरून निघेल." "मोजणीचा अर्ज आल्यानंतर अवघ्या 15 दिवसांत मोजणी पूर्ण झाली पाहिजे, ही सरकारची ठाम भूमिका आहे. यासाठी सध्या 1,200 सर्व्हेअर्स कार्यरत असून, लवकरच 5,000 लायसन्स (खासगी) सर्व्हेअर्स नेमले जातील. आयटीआय आणि इंजिनिअरिंगच्या तरुणांना 15 दिवसांचे रोव्हर व ड्रोनचे प्रशिक्षण देऊन प्रतिमहिना 35,000 रुपये मानधन दिले जाईल. त्यांना महिन्यातून किमान 20 मोजण्या पूर्ण कराव्या लागतील." विधानपरिषद निकालानंतर महायुतीमध्ये उफाळलेल्या अंतर्गत वादावर समन्वय समितीचे प्रमुख म्हणून त्यांनी भूमिका मांडली. "विधानपरिषद निवडणुकीत स्थानिक पातळीवर कमी-जास्त काम झाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये व नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप झाले आहेत. मात्र येत्या मंगळवारी महायुतीची समन्वय बैठक होत असून, पक्षाची चौकट ओलांडून तोंडसुख घेणाऱ्या वाचाळवीरांना आपापल्या पक्षाकडून कडक समज दिली जाईल."

महायुतीच्या स्थिरतेवर कल्याण काळेंचा सवाल; सत्तेच्या वाटणीवरून मतभेद

नीव दिल्ली : "देशातील सर्वोच्च न्यायालय असो, निवडणूक आयोग असो वा रिझर्व्ह बँक; ज्या स्वायत्त व वैधानिक संस्थांवर लोकशाहीचा डोलारा उभा आहे, त्या सर्व संस्थांची केंद्र सरकारकडून पद्धतशीरपणे गळचेपी सुरू आहे. लोकशाही संपवून देशात सरळसरळ हुकूमशाही सुरू झाली आहे. मतचोरी करणाऱ्या आणि भाजपच्या तालावर नाचणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात आज काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी इंडिया आघाडीतील सर्व नेते एकत्र येऊन प्रतीकात्मक 'महाभियोग' चालवणार आहेत. उद्या रामलीला मैदानावर देशाच्या इतिहासातील सर्वात मोठी महारॅली निघेल," असा थेट इशारा जालना लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस खासदार डॉ. कल्याण काळे यांनी दिला आहे. नवी दिल्ली येथे माध्यमांशी संवाद साधताना खासदार काळे यांनी केंद्रातील भाजप सरकारचे संस्थांवरील नियंत्रण, रामलीला मैदानावरील महारॅली, आणि महाराष्ट्रातील विधानपरिषद निकालानंतर महायुतीमध्ये उफाळलेल्या अंतर्गत संघर्षावर सडेतोड भाष्य केले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर बोट ठेवत खासदार कल्याण काळे म्हणाले, "केंद्रीय यंत्रणा आणि एसआयआरच्या माध्यमातून मतांची चोरी केली जात आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे निष्पक्ष काम न करता थेट भारतीय जनता पक्षाचे हस्तक म्हणून काम करत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे." "जेव्हा देशातील न्यायव्यवस्था, रिझर्व्ह बँक आणि निवडणूक आयोग यांसारख्या वैधानिक संस्थांचे स्वातंत्र्यच हिरावून घेतले जाते, तेव्हा देशात लोकशाही शिल्लक उरत नाही. हे रोखण्यासाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात आज खरगे यांच्या निवासस्थानी विरोधक एकत्र येऊन ज्ञानेश कुमारांविरुद्ध महाभियोग चालवतील."

नीलेश राणेंच्या ट्विटला नवनाथ बन यांचे प्रत्युत्तर; महायुतीत राजकीय वादाला तोंड

मुंबई : विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निकालानंतर महायुतीमधील भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील अंतर्गत संघर्ष आता अत्यंत टोकाला पोहोचला आहे. पुणे पदवीधर मतदारसंघातील पराभवावरून भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेनेवर उघडपणे खापर फोडल्यानंतर शिंदे सेनेचे नेते आमदार निलेश राणे यांनी थेट नवनाथ बन यांची लायकी काढत "तुला रडायलाही वेळ देणार नाही" असा उघडा इशारा दिला होता. मात्र, नीलेश राणेंच्या या आक्रमक ट्विटला नवनाथ बन यांनी थेट त्यांचे वडील आणि भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्यासोबतचा खास फोटो शेअर करत अत्यंत मर्मभेदी उत्तर दिले आहे. "ज्युनिअर नवनाथ बन विथ सिनिअर लीडर नारायण राणे साहेब!" अशा अवघ्या एका ओळीच्या कॅप्शनने बन यांनी निलेश राणेंना त्यांची जागा दाखवून दिल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगली आहे. पुणे पदवीधरमध्ये महायुतीचा घात झाल्याचा आरोप करत सुरू झालेला हा वाद आता नेत्यांच्या वैयक्तिक लायकी, वरिष्ठता आणि सोशल मीडिया वॉरपर्यंत येऊन ठेपला आहे. नवनाथ बन यांनी पत्रकार परिषदेत नीलेश राणे हे माझे जवळचे मित्र असल्याचे वक्तव्य केले होते. त्यावर संतप्त होत आमदार नीलेश राणे यांनी सोशल मीडियावरून बन यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन हल्ला चढवला होता. "नवनाथ बन शिंदे साहेबांवर बोलताना लायकीत राहायचं. तुझी लायकी किती, तू बोलतो किती! याद राख, तुला रडायला पण वेळ देणार नाही," असा सज्जड दम निलेश राणेंनी भरला. "नवनाथ बन माझा कसलाही मित्रबित्र नाही, तो माझा ज्युनियर आहे. मी 2009 मध्ये खासदार झालो होतो, तेव्हा तो चड्डीत फिरत होता. मी कोणत्याही ऐऱ्यागैऱ्या व्यक्तीला मित्र बनवत नसतो." "मी स्वतः साताऱ्यात वाई आणि फलटणची जबाबदारी सांभाळत होतो. भाजप निवडणूक लढवत असताना त्यांनी आम्हाला साधा एक मेसेजही पाठवला नाही. माझ्या जिल्हाप्रमुखाला पत्ता नव्हता, भाजपचा एकही माणूस फिरकला नाही; तरीही आम्ही महायुती म्हणून सहकार्य केले. त्यामुळे काम कसे करायचे हे नवनाथ बनने आम्हाला शिकवू नये. तू कोण आहेस विचारणारा? आम्ही आमच्या नेत्यांना आणि देवेंद्र फडणवीसांना उत्तर देऊ."निलेश राणे यांनी राजकीय वरिष्ठता आणि अनुभवाचा दाखला देत नवनाथ बन यांना कनिष्ठ ठरवण्याचा प्रयत्न केला होता. यावर प्रत्युत्तर देण्यासाठी बन यांनी कोणत्याही शाब्दिक वादात न पडता थेट राजकीय खेळी केली. नवनाथ बन यांनी निलेश राणे यांचे वडील तथा भाजपचे वरिष्ठ नेते खा. नारायण राणे यांच्या शेजारी अत्यंत आपुलकीने बसलेला फोटो सोशल मीडियावर पोस्ट केला. या फोटोला त्यांनी "ज्युनिअर नवनाथ बन विथ सिनिअर लीडर नारायण राणे साहेब!" अशी अत्यंत सूचक आणि बोचरी कॅप्शन दिली. "तुम्ही मला ज्युनियर म्हणून हिणवत असाल, तरी माझी उठबस आणि संवाद थेट तुमच्या वडिलांशी म्हणजेच भाजपच्या सर्वोच्च नेतृत्वाशी आहे," असा स्पष्ट संदेश नवनाथ बन यांनी या पोस्टमधून निलेश राणेंना दिला आहे. पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपच्या उमेदवार स्मिता जाधव यांचा निसटता पराभव झाल्यानंतर भाजप नेत्यांनी शिवसेनेच्या रवींद्र धंगेकरांवर थेट आरोप केले होते. रवींद्र धंगेकरांनी भाजप उमेदवाराविरोधात अधिकृत सोशल मीडिया पेजवरून प्रचार केल्याचे पुरावे भाजपने समोर आणले होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ नोव्हेंबर २०२६

ओळखता आले पाहिजे

काम करतांना आपुलकीची,
माणसं कळायला लागतात.
जिवाभावाचीच माणसच,
दिलेल्या शब्दाला जागतात. १

मित्र संकटात असल्यावर,
निस्वार्थपणे ते धावतात.
कुठलाही स्वार्थ न पाहता,
कामात हातभार लावतात. २

प्रत्येकाने जपून ठेवावा,
जीवनात निस्वार्थ मित्र.
तेव्हाच दिसेल भविष्यात,
जीवनातले सुंदर चित्र. ३

ओळखता आले पाहिजे,
माणसाच्या मनातील भाव.
खेळता येईल मनसोक्त,
जीवनात मनासारखे डाव. ४

चार दिवसाचे जगणे करावे,
चार मित्र आनंदाने मिळून.
कितीही मोठे दुःख आले तरी,
जाईल क्षणाधार्त दूर पळून. ५

नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर
मो.नं. ९७६३२८३७०४

जिंतूरकरांनो, पाणी जपून वापरा; भविष्यातील तीव्र पाणीटंचाई टाळण्यासाठी नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांचे परखड आवाहन

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : "पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल; पाणी बचत हीच काळाची गरज!"नळ उघडे सोडणे, टाक्या वाहू देणे थांबवा; निष्काळजीपणा भोवणार! "पाणी ही केवळ निसर्गाची देणगी नसून मानवी जीवनाचा मुख्य आधार आहे. भविष्यातील भीषण पाणीटंचाईचे संकट टाळायचे असेल, तर जिंतूर शहरातील प्रत्येक नागरिकाने आजपासूनच पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरला पाहिजे," असा इशारा आणि परखड आवाहन जिंतूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांनी केले आहे.शहरातील वाढती पाण्याची गरज आणि उपलब्ध साठा यांचा मेळ घालण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू असतानाच, नागरिकांच्या बेफिकिरीमुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना नगराध्यक्ष देशमुख म्हणाले, "पाण्याचा प्रश्न हा केवळ नगर परिषदेच्या प्रशासनापुरता मर्यादित नसून त्याचा थेट संबंध जिंतूरकरांच्या दैनंदिन आयुष्याशी आहे. अनेक घरांमध्ये नळ विनाकारण सुरू ठेवले जातात, पाण्याच्या टाक्या भरून वाहतात, तर काही ठिकाणी पाईपलाईन गळतीकडे दुर्लक्ष केले जाते. हा निष्काळजीपणा आता थांबवावाच लागेल."नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांचे महत्त्वाचे मुद्दे व आवाहन:अपव्यय तात्काळ थांबवा : घरगुती वापरापासून ते सार्वजनिक ठिकाणांपर्यंत पाण्याचा काटकसरीने वापर करा. नळ उघडे सोडू नका आणि टाक्या भरल्यानंतर मोटर त्वरित बंद करा.गळतीची त्वरित दुरुस्ती: घर किंवा परिसरातील नळ आणि पाईपलाईनमधून पाणी गळती होत असल्यास ती नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन तात्काळ दुरुस्त करून घ्यावी.भविष्यातील पिढीसाठी संवर्धन: आज वाचवलेला पाण्याचा प्रत्येक थेंब उद्याच्या पिढीचे भविष्य सुरक्षित करणार आहे. गरज असेल तितकेच पाणी वापरण्याची सवय प्रत्येकाने स्वतःला लावून घेतली पाहिजे.प्रशासन आणि नागरिकांचे सहकार्य: नगर परिषद प्रशासन शहराच्या पाणीपुरवठ्याचे नियोजन करत आहे, परंतु या प्रयत्नांना यश येण्यासाठी जिंतूरकरांच्या पूर्ण सहकार्याची आवश्यकता आहे.'पाणी आहे तर उद्या आहे!'आपल्या आवाहनाचा शेवटी कडक शब्दांत संदेश देताना नगराध्यक्ष देशमुख म्हणाले, "पाणी बचतीचा संकल्प हा केवळ कागदावर किंवा भाषणापुरता राहता कामा नये, तो प्रत्येकाच्या कृतीत दिसला पाहिजे. निसर्गाने दिलेल्या या अनमोल संपत्तीचा अनादर महागात पडू शकतो. त्यामुळे 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' हा ध्यास घेऊन आपल्या जिंतूर शहराचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे."नगर परिषदेच्या या आवाहनानंतर आता जिंतूरकर पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी किती गांभीर्याने पावले उचलतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

कराळेंच्या मतांवर पंकज भोयर यांचे वक्तव्य; भाजपने आत्मचिंतन करण्याची गरज

नागपूर : "नागपूर पदवीधर मतदारसंघातील जागा भारतीय जनता पक्षासाठी अत्यंत प्रतिष्ठेची होती. त्या निवडणुकीत पराभव झाला हे वास्तव असून ते स्वीकारले पाहिजे. अपक्ष उमेदवार नीतेश कराळे यांनी घेतलेली मते ही निश्चितपणे भाजपची पारंपरिक मते नव्हती, तर भाजपला न मिळणारी मते त्यांना मिळाली. मात्र, तरीही कराळेंना एवढ्या मोठ्या प्रमाणावर मते कशी मिळाली, याची दखल पक्षाने घेतली असून पराभवाच्या कारणांचे सखोल व गंभीर आत्मचिंतन केले जाईल. भविष्यात या चुका दुरुस्त करूनच पक्ष पुढील निवडणुकांना सामोरा जाईल," अशी रोखठोक कबुली राज्याचे गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी नागपूर येथे दिली. नागपुरात पत्रकारांशी संवाद साधताना पंकज भोयर यांनी विधानपरिषद निवडणुकीतील अपयश, 2 नोव्हेंबर रोजी होणारी भाजपची महत्त्वाची बैठक, पुण्यातील राणा सूर्यवंशी हल्ला प्रकरणातील तपास, परीट-धोबी समाजाचे आरक्षण आंदोलन, कंत्राटदारांची थकीत बिले आणि महायुतीतील नेत्यांच्या वक्तव्यांवर सविस्तर भूमिका मांडली. नागपूर पदवीधर मतदारसंघातील पराभवाच्या कारणांवर बोलताना गृह राज्यमंत्री म्हणाले, "नागपूर पदवीधर मतदारसंघात सर्वच नेते आणि पदाधिकाऱ्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले होते, तरीही यश आले नाही. आता एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात काहीही अर्थ नाही. निवडणुकीत अपयश आले ही वस्तुस्थिती स्वीकारून पक्ष आत्मपरीक्षण करत आहे. वर्धा आणि नागपूर परिसरात नीतेश कराळे यांच्या उमेदवारीमुळे भाजपचे मोठे नुकसान झाल्याची चर्चा आहे. मात्र कराळेंनी घेतलेली मते भाजपची नव्हती. तरीही त्यांना एवढी मते कशी मिळाली, यावर पक्ष गांभीर्याने विचार करत आहे.“ "भाजप प्रदेशाध्यक्ष आणि संघटन मंत्र्यांचे संपूर्ण राज्यभरात विभागनिहाय दौरे सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर २ नोव्हेंबर रोजी नागपुरात पराभवाचा संघटनात्मक आढावा घेण्यासाठी आणि पुढील रणनीती ठरवण्यासाठी प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडणार आहे.“ पुण्यातील राणा सूर्यवंशी यांच्यावरील कथित हल्ला आणि रवींद्र धंगेकर यांनी उपस्थित केलेल्या संशयावर त्यांनी स्पष्टीकरण दिले. "राणा सूर्यवंशी यांच्यावर हल्ला झाल्याची पहिली तक्रार पोलिसांकडे आली होती. त्यानंतर हा हल्ला बनावट असल्याच्या तक्रारीही दाखल झाल्या. या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीअंती या प्रकरणात जो कोणी दोषी आढळेल, त्याच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल.“ भाजप आणि शिंदे सेनेमध्ये गेल्या काही दिवसांत रंगलेल्या शाब्दिक वादावर त्यांनी सावध भूमिका मांडली. “मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यात उत्तम आणि मजबूत समन्वय आहे. स्थानिक पातळीवर काही नेते अनेकदा भावनांच्या भरात जाऊन आक्रमक विधाने करतात. मात्र, महायुती भक्कम असून अंतर्गत वादाचा फायदा विरोधकांना होऊ नये यासाठी नेत्यांनी सार्वजनिक विधाने करताना काळजी घेणे आवश्यक आहे.“ नागपुरातील इतर स्थानिक आणि प्रशासकीय मुद्द्यांवरही त्यांनी भाष्य केले. "परीट समाजाला अनुसूचित जातीत (SC) समाविष्ट करण्याची शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने आधीच केंद्राकडे पाठवली आहे. अंतिम निर्णय होईपर्यंत या समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतींचा शासन निर्णय (GR) तातडीने जारी व्हावा, यासाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून सकारात्मक तोडगा काढला जाईल.“

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

आयुक्त संजय काटकर यांच्याकडून बीड येथे मराठवाडा विभागातील आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा

बीड (भगवंत पाळवदे) : मराठवाडा विभागातील आरोग्य सेवांचा आढावा घेण्यासाठी माननीय आयुक्त श्री. संजय काटकर यांनी आज बीड येथे भेट देऊन विभागातील विविध आरोग्य योजना, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम आणि आरोग्य संस्थांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील आरोग्य सेवांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला.आरोग्य विभागांतर्गत कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या महाराष्ट्रातील 14787 कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाल्याच्या पार्श्वभूमीवर आयुक्त श्री. संजय काटकर यांचे आरोग्य विभागाच्या वतीने स्वागत व अभिनंदन करण्यात आले.या आढावा बैठकीमध्ये 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान, सेवा संकल्प अभियान, टीबी निर्मूलन कार्यक्रम तिशीचा पल्ला तपासणी अन सल्ला, कुटुंबकल्याण कार्यक्रम तसेच आरोग्य विभागाच्या विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.कुटुंबकल्याण कार्यक्रमात बीड जिल्ह्याची महाराष्ट्रात अव्वल कामगिरी!कुटुंबकल्याण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये बीड जिल्ह्याने महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. कुटुंबकल्याण सेवांचे नियोजन, जनजागृती, लाभार्थ्यांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविणे आणि आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांचे योगदान यामुळे जिल्ह्याने ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.तसेच 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत जिल्ह्यातील गावांमध्ये विविध आरोग्यविषयक उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू असल्याचे आढावा बैठकीत निदर्शनास आले. बीड जिल्ह्यात नागरिकांना विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांबद्दल आयुक्त श्री. संजय काटकर यांनी समाधान व्यक्त केले.यावेळी लातूर विभागाचे उपसंचालक डॉ. सतीश सोळुंके तसेच बीड जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांनी आपापल्या स्तरावर नियोजनबद्ध पद्धतीने आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दलही आयुक्तांनी समाधान व्यक्त केले.उपजिल्हा रुग्णालय केजची पाहणी; गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवेसाठी सूचनाआढावा बैठकीनंतर आयुक्त श्री. संजय काटकर यांनी उपजिल्हा रुग्णालय, केज येथे प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णालयातील विविध विभागांची पाहणी केली. रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा, वैद्यकीय सेवा, स्वच्छता, औषधसाठा आणि रुग्णालयाच्या एकूण कामकाजाची माहिती घेतली. आरोग्य सेवा अधिक गुणवत्तापूर्ण, गतिमान आणि रुग्णाभिमुख करण्यासाठी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.अंबाजोगाई येथे हिमोफिलिया डे केअर सेंटरचे उद्घाटनयानंतर अंबाजोगाई येथे हिमोफिलियाडे केअर सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. या केंद्रामुळे हिमोफिलिया आजाराने ग्रस्त रुग्णांना आवश्यक तपासणी, उपचार आणि तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे रुग्णांना स्थानिक स्तरावर आरोग्य सुविधा मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे.मराठवाड्यातील आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थितया आढावा बैठकीस मराठवाड्यातील नांदेड व हिंगोली हे जिल्हे वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यांचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी, सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक, निवासी वैद्यकीय अधिकारी तसेच वैद्यकीय अधीक्षक उपस्थित होते.मराठवाडा विभागातील आरोग्य सेवांचा सर्वांगीण आढावा, आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी, आरोग्य संस्थांची प्रत्यक्ष पाहणी आणि नवीन आरोग्य सुविधांची उपलब्धता या माध्यमातून नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वपूर्ण ठरला

पाणी म्हणजे जीवन

पाणी म्हणजे जीवन
असू द्या ध्यानी
पाण्याचा दुरूपयोग
करू नका कुणी

पाहिजे तेवढेच पाणी
पिण्यासाठी घेऊ
पाण्याचे स्त्रोत
प्रदुषणमुक्त ठेऊ

पावसाचे पाणी
योग्य पध्दतीने आडवू
शोषखड्डे करून
जमिनीत जिरवू

परसबागेत वळवू
घरातील सांडपाणी
झाडावर बसून
पक्षी गातील गाणी

नळाखाली अंघोळ
आपण सर्व टाळू
पाणी बचतीचे
नियम आता पाळू

थेंब थेंब पावसाचे
करूया संवर्धन
उद्यासाठी जपूया
अनमोल धन

- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

सरदार पटेल

माझ्या मराठवाड्याची,माती ऋणात
तुमच्या
तुम्ही धावले म्हणून,मुक्त झाल्या दाही
दिशा.

तुम्ही सांभाळला मनी, छत्रपतींचा
वारसा
तेव्हा उगवला इथं,सूर्य पहा
स्वातंत्र्याचा.

सूर्य,चंद्र रोज गाई, गीत तुमचे नव्याने
सत्याग्रह बारडोली,तुमच्याच प्रेरणेने.

यज्ञकुंडी स्वातंत्र्याच्या,दान केली
जिंदगानी
पहा सांगते आकाश,नित्य नवीन
कहाणी.

सरदार हे पटेल, दम नावातच भारी
सेवा भारतमातेची,केली तुम्ही
खरीखुरी.

एकतेच्या माळेमध्ये, प्रांत देशाचे
गुंफले
पांग फेडून भूमीचे,लोहपुरुष ठरले.

ज्ञानेश्वर गायके,
कन्नड
आगामी " पाचुंदा " कविता
संग्रहातून

बारवाले महाविद्यालयात सरदार पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

जालना : सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले. प्र. प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ नोव्हेंबर २०२६

श्रीकृष्ण महाविद्यालयात इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन

उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे) तालुक्यातील गुंजोटी येथे आज श्रीकृष्ण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन व सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले , प्रा. बालाजी कोनाळे आणि अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड उपस्थित होते. या नियोजित कार्यक्रमाविषयी माहिती देताना प्रा. राजाराम निगडे यांनी दोनही व्यक्तिमत्त्वाबद्दल सांगितले की, इंदिरा गांधी यांचे शालेय व उच्च शिक्षण प्रयागराज, पुणे ,मुंबई तसेच स्वित्झर्लंड आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात झाले होते. लहानपणापासूनच त्यांना देशाच्या स्वातंत्र्यलढ्याची आवड होती . लालबहादूर शास्त्री यांच्या निधनानंतर 1966 मध्ये त्या भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान म्हणून निवडल्या गेल्या . आजही त्या भारताच्या आयरन लेडी (लोहकन्या) म्हणून ओळखल्या जातात .त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकर्दीमध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण, पूर्व पाकिस्तानचे विभाजन करून बांगलादेशाची निर्मिती, अणुचाचणींना दिलेली चालना, असे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले गेले. एक राष्ट्र म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी भारताला एक स्वतंत्र ओळख मिळवून दिली .31 ऑक्टोबर 1984 रोजी नवी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी त्यांच्याच अंगरक्षकांनी त्यांची गोळ्या घालून हत्या केली. त्यांच्या मृत्यूनंतर तेंव्हापासून त्यांचा स्मृतिदिन साजरा केला जातो. भारताचे दुसरे उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक ज्येष्ठ नेते स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि पहिले गृहमंत्री होते त्यांना भारताचे लोहपुरुष म्हणून आजही ओळखले जाते त्यांचा जन्म हा 31 ऑक्टोबर 1875 मध्ये गुजरात येथे झाला बारडोली सत्याग्रह संस्थानांचे विलीनीकरण या त्यांचा महत्त्वाचा वाटा होता देशाचे अखंडत्व टिकवण्यात त्यांची मोलाची भूमिका होती त्यांची जयंती ही राष्ट्रीय एकता दिवस म्हणूनही साजरी केली जाते. त्यामुळे भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आज दिनांक 31 ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो .याअनुषंगाने आज श्रीकृष्ण महाविद्यालयातही विद्यार्थी, स्वयंसेवक ,कार्यक्रमधिकारी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी यांना प्रा. डॉ.बालाजी कोणाळे यांनी "राष्ट्रीय एकता दिवस शपथ" देण्यात आली. यात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांच्या अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

पंतप्रधान मोदींकडून मराठवाडा पैठणीच्या कलेची दखल; महाराष्ट्र पर्यटन विभागाचा गौरव

दौलताबाद (जावेद अहमद) : भारत पर्व २०२६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महाराष्ट्र पर्यटन दालनास भेट मराठवाडा पैठणीच्या पारंपरिक कलेची घेतली दखल/पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पर्यटन उपसंचालक विजय जाधव यांच्याशी साधला संवाद.महाराष्ट्र पर्यटन विभागाचा राष्ट्रीय स्तरावर प्रधान मंत्र्यांच्या हस्ते गौरव.गुजरातमधील एकतानगर (केवडिया) येथील जगप्रसिद्ध स्टॅच्यू ऑफ युनिटी परिसरात आयोजित भारत पर्व २०२६ या कार्यक्रम चालू असून देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या पैठणी दालनास सदिच्छा भेट दिली. यावेळी महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाचे पर्यटन उपसंचालक श्री. विजय जाधव यांनी पंतप्रधानांचे स्वागत केले.या भेटीदरम्यान पंतप्रधानांनी महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेल्या पारंपरिक पैठणी साड्यांची व त्यावरील कलाकुसरीचे सूक्ष्म निरीक्षण केले पैठणी वरील बीविणकाम याबाबत आस्थेने पाहणी केली त्यानंतर "वस्त्रोकि महाराणी पैठणी" पैठणीच्या निर्मिती मागील वैशिष्ट्यपूर्ण कलाकुसर, विणकामातील बारकावे आणि या पारंपरिक कलेचे महत्त्व याबाबत पंतप्रधानांना श्री विजय जाधव यांनी माहिती करून दिली.विशेष म्हणजे, यापूर्वी पंतप्रधानांनी 'मन की बात' या कार्यक्रमातून पैठणीचा उल्लेख केला होता. भारत पर्वमधील भेटीदरम्यान पंतप्रधानांनी महाराष्ट्रातील पर्यटनाच्या बाबतीतील कलाकुसर पाहून प्रभावित झाले. महाराष्ट्र पर्यटन विभागाच्यावतीने पैठणी स्टॉल उभारण्यात आला होता. त्यावेळी विजय जाधव यांनी पैठणी विणकर श्रीमती कविता अरुण ढवळे यांची ओळख करून दिली असता त्यांच्याशी संवाद साधत आतापर्यंत किती जणांना पैठणी विणकामाचे प्रशिक्षण दिले आहे, अशी आवर्जून विचारणा केली. पारंपरिक पैठणी कलेच्या माध्यमातून स्थानिकनाव येथील कारागिरांना रोजगार व कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी देता येऊ शकतात व नवीन स्टार्ट उप चालू करता येऊ शकते अशीही माहिती व चर्चा करण्यात आली.भारत पर्वमधील महाराष्ट्र पर्यटन दालनाच्या माध्यमातून राज्यातील पर्यटनस्थळे, ऐतिहासिक वारसा, पारंपरिक हस्तकला, हातमाग, कला-संस्कृती आणि खाद्यसंस्कृतीचे दर्शन देशभरातील पर्यटक व अभ्यागतांना घडविण्यात येत आहे.पंतप्रधानांच्या या भेटीमुळे महाराष्ट्राच्या समृद्ध कला, संस्कृती आणि पारंपरिक हस्तकलेला राष्ट्रीय स्तरावर विशेष प्रसिद्धी मिळाली असून, महाराष्ट्र पर्यटनासाठी ही अभिमानास्पद बाब ठरली आहे.यावेळी सहाय्यक जिल्हा पर्यटन अधिकारी शोएब शाह आणि किरण गाडेकर यांचीही उपस्थिती होती.

पाठ्यपुस्तकातील लेखकाला पाहून विद्यार्थिनी भारावल्या

छत्रपती संभाजीनगर : बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील लेखक तथा कवी अय्युब पठाण लोहगावकर हे बीड जिल्ह्यातल्या शाळेच्या भेटीला असताना तेथील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी हे लेखकाला प्रत्यक्ष पाहून खुपच भारावले होते. अय्युब पठाण लोहगावकर यांनी त्यांचा चौथीला असलेला "कौतुकाची थाप " या पाठाच्या माध्यमातून नुकतेच बीड जिल्ह्यातातील सात शाळेमध्ये लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला हा नावीन्यपूर्ण उपक्रम घेऊन शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची गोडी निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला होता.याप्रसंगी मराठवाड्यातील लोकप्रिय शिक्षक आमदार विक्रमजी काळेसाहेब आणि प्रदीप विखे, मनोज खुटे, विपुलभैय्या काळे, प्रथमेश संगेवार यांच्यासह विविध शाळेतील शिक्षक शिक्षिका आणि विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.

छत्रपती शिवाजी महाविद्यालयात एकता दौड आणि नशामुक्ती जनजागृती अभियान

उमरगा : भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बंधुभाव आणि व्यसनमुक्त समाजाचा संदेश जनमानसात रुजविण्याच्या उद्देशाने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, पोलीस ठाणे उमरगा आणि रोटरी क्लब उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने 'एकता दौड व नशामुक्ती जनजागृती अभियानाचे' आयोजन करण्यात आले होते.या अभियानाच्या माध्यमातून एकता, बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सलोखा जपण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच तंबाखू, गुटखा, मद्य आणि इतर अमली पदार्थांच्या व्यसनांपासून दूर राहून निरोगी व व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी योगदान देण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.यावेळी 'एकता, बंधुभाव आणि व्यसनमुक्त समाज हीच खरी देशसेवा', 'एक भारत, श्रेष्ठ भारत' आणि 'व्यसनाला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार' या विषयांवर मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. देवरकर, उमरगा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. प्रल्हाद सूर्यवंशी आणि रोटरी क्लब उमरगाचे अध्यक्ष रोटे अनिल मदनसुरे यांनी राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व, सामाजिक सलोखा आणि व्यसनमुक्त जीवनशैली याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या उपक्रमात महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. संतोष जाधव, प्रा. संदीप गुरव, एनएसएस स्वयंसेवक, एनसीसी छात्रसेना, तात्याराव मोरे फार्मसी महाविद्यालयाचे प्राध्यापक, रोटरॅक्ट क्लब जिजाऊच्या विद्यार्थिनी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासोबतच युवकांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक जनजागृतीचा संदेश देणारा ठरला.या अभियानाचे आयोजन श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, पोलीस ठाणे उमरगा आणि रोटरी क्लब उमरगा यांच्या संयुक्त पुढाकारातून करण्यात आले.

८. आक्रमणाची पूर्वतयारी

समीरने धैर्यधरला सर्व वृत्तान्त सांगितला. एक अक्षौहणी सैन्य, पाच सहस्त्र गजदल, सात सहस्त्र घोडदल, पायदळ, दारुगोळा, शस्त्रे यांची सर्व माहिती दिली. सैनापती धैर्यधर ते सर्व ऐकताच गर्भगळीतच झाला. गुप्तचरांनीदेखील माहिती दिली होती की रुपलनगरचा राजा चन्द्रसेन हा खूपच तयारीनिशी सारसनगरवर आक्रमण करणार आहे. रूपलनगरचा सेनापती चक्रधर स्वतः मोहिमेवर आहे. तडकाफडकी राजे सुर्यसेन यांना धैर्यधर भेटला. सुर्यसेन महाराजांनी त्वरीत सर्व मन्त्री मण्डळाची सभा बोलावली. सुर्यसेनने आपल्या तयारीविषयी धैर्यधरला विचारले, तर धैर्यधरने सांगितले की "रूपलनगरच्या बलाढ्य सेनेला पराभूत करता येईल एवढी तयारी आपली नाही." "आपण अवन्तीनगरकडे मदत मागितली तर ?" महाराज सूर्यसेन "शत्रू तर आपल्या सीमेवर येऊन उभा आहे. अवन्तीनगरची सीमा अग्नेयला आणि रूपलनगरची सीमा वायव्येला आहे म्हणजेच दोन्ही विरुद्ध बाजूला आहेत. त्यामुळे त्यांची सेना तेथपर्यन्त पोहोचायला बराच वेळ लागेल. तेवढा वेळ आपल्याकडे नाही. शिवाय अवन्तीनगरची सेना आधीच चित्रापूरच्या होणाऱ्या सततच्या आक्रमणात अडकलेली असते... त्यामुळे ते शक्य नाही." - सेनापती धैर्यधर.

"महाराज, आपण रूपलनगरचे महाराज चन्द्रसेन यांना जर खण्डणी दिली तर... आपल्याकडचे थोडे धन कमी झाल्याने काही फरक पडणार नाही." - अमात्य. "अमात्य, केवळ एकदा खण्डणी देवून चालणार नाही तर वारंवार द्यावी लागेल. ते शक्य नाही." - सुर्यसेन. "पण एवढ्या विशाल सैन्यासमोर आपला काहीच टिकाव लागणार नाही महाराज... आपल्या गुप्तचरांनीदेखील समीर सांगतो तोच माहिती मला दोन दिवसांपूर्वी दिली..." - धैर्यधर. "महाराज क्षमा असावी. मी काही बोलू का ?" - समीर. "हं बोल... पण तू कोण ?" - सूर्यसेन.

"महाराज, मी वायव्य सीमेवरचा सीमा प्रहरी समीरकुमार आणि भाग्यनगरचा रहिवासी. मीच त्या रूपलनगरच्या सैन्य शिबीरात शिरून कोणालाही न कळता सर्व माहिती काढून आणली." - समीर "अरे, त्यांच्या शिबीरात घुसण्याचे एवढे मोठे धाडस तू केलेस... जर तुझ्याबाबत समजले असते तर थेट शिरच्छेदच केला असता." - सूर्यसेन. "माझ्या मातृभूमीसाठी मी माझे बलिदान द्यायला तयार आहे." -समीर.

"वाऽऽ खूपच छान... असे धैर्य व देशभक्ती हवी... बोल काय सांगायचे आहे..." - सूर्यसेन

"महाराज, जरी आपली सैन्य शक्ती व शस्त्रे कमी असले तरी आपण रूपलनगरचा पाडाव करू शकतो. आपण त्यांच्या सैन्याचे विभाजन करू शकतो त्यामुळे त्यांची ताकद विभागली जाईल त्याच वेळी आपण हल्ला करून त्यांना पराभूत करू..." - समीर. "हे शक्य नाही. काहीही काय बोलतोस... तु कालचा पोरगा, सैन्यात आत्ताआत्ताच भरती झाला आणि आम्हाला शिकवतोस... ?" - धैर्यधर

"ह्याला तर गवताच्या काडीसारखा उडवून लावेल तो रूपलनगरचा सेनापती चक्रधर, याच्या हाती नेतृत्वाची कमान सोपविणे म्हणजे पराभव निश्चितच..." सेनापती धैर्यधर यांचा मुलगा अनयकुमार याने धैर्यधर यांच्या बोलण्याला दुजोरा दिला. "सेनापती हे आक्रमण कसे परतवून लावायचे याचे उत्तर आहे तुमच्याकडे... नाही ना ? मग तो काय म्हणतो ते ऐका. काय समीरकुमार आपण रूपलनगरला पराभूत करू शकतो, शक्य आहे ते ?" - सूर्यसेन महाराज.

"हो शक्य आहे महाराज.." समीर आपल्या अक्कडबाज मिशीवर पालथी मुठ फिरवित मोठ्या आत्मविश्वासाने म्हणाला... "ठिक आहे मग... या मोहिमेचे नेतृत्व तूच कर. तुला काय हवे ते सेनापती धैर्यधर देतील." - सूर्यसेन महाराज. समीरने पाचशे बैल, सहा मण तिखट, बरीचशी छोटी-छोटी मडकी यांची मागणी केली. लढाईसाठी आवश्यक तो दारुगोळा, शस्त्रे व सैनिक यांचीही मागणी केली. खास भीमथडी घोडे व हत्तीही मागीतले. चन्दवल्लभही त्याच्या सोबत हवा असे सांगितले. समीरने भाग्यनगरमधील व इतर भागातील सर्व म्हणजे पाचशेपेक्षाही जास्त कुत्री आपल्याबरोबर घेतली आणि निघाला वायव्य सीमेकडे.

समीर व चन्द्रवल्लभने जसे टेहळणीचे काम सुरू केले होते त्या दिवसापासून त्या निबिड अरण्यात खूप भटकन्ती केली होती. त्याच अरण्यातून गण्डगी नदीही वाहत होती. तिथे नदीचे पात्र खूप विस्तिर्ण व खोल झालेले होते. दोघेही नदीपात्रात बालपणापासून पोहत होते. त्यामुळे नदीपात्राची व अरण्याची खडान् खडा माहिती त्यांना होती. इतकेच नव्हे तर मोती कुत्र्यालाही अरण्यातील वाटा माहिती होत्या.

सर्व सुसज्जतता झाल्यानन्तर समीर व चन्द्रवल्लभने तयारी सुरु केली. 'कोणीही आग पेटवू नये' ही सक्त सूचना दिली. केवळ अरण्यातील फळे, कन्दमुळे, पानेच खावून पोट भरायचे असे सांगितले. समीरने सैनिकांना मडक्यांना बाहेरून चुना फासून पांढरे करायला व तिखट भरायला सांगितले. काही सैनिकांना सांगितल्याप्रमाणे ती मडकी झाडाला टांगायला लावली. कोणकोणत्या झाडांवर मधमाशीची पोळी आहेत ते दाखवून दिले. काही झाडांच्या खोडांना चुना फासून पांढरा रंग दिला होता. दोनशे सैनिकांना नदी पात्र ओलांडून पलिकडे जाण्यास सांगितले. काही सैनिकांना मेंढपाळ, गुराख्यांचा पोशाख करायला सांगितला. अरण्यातील जो मार्ग सुकर होता तेथे मोठमोठी ओण्डकी टाकून बन्द केले. नदीपात्रातील डोहाकडे जाणारे एक दोन मार्ग सुकर करून ठेवले. बऱ्याच ठिकाणी खोल खड्डे खणून हत्ती पकडण्यासाठी सापळे तयार करून ठेवले. भाग्यनगरची जी कुत्री सोबत आणली होती ती आणि अरण्यातील आणखी काही कुत्री त्यांच्या पन्नास पन्नाच्या तुकड्या तयार करून काही सैनिकांना त्यांच्या सोबत राहून त्या कुत्र्यांना अरण्यातील वाटा माहिती करून देण्यास सांगितले. समीरची ही तयारी अगदी गुपचूप आवाज न करता व रात्री चालू असे. अवघ्या दोन-तीन रात्रीत सर्व तयारी करून घेतली. रूपलनगरच्या सैन्यावर नजर ठेवण्यासाठी काही गुप्तहेर पाठविले. तसेच रूपलनगरच्या सैन्याच्या थोडे लाम्ब बैले व मशाली घेऊन गुराखी, मेंढपाळच्या पोषाखातील सैनिकांना सन्देशाची वाट पहात थांबण्यास सांगितले. (क्रमशः)

अनिकेत भालेराव.
भ्रमणध्वनी : 9422504608

राया ठाकर फाउंडेशनची ठाकरवाडीत सदिच्छा भेट; संघटनात्मक कार्यावर चर्चा

खुलताबाद (सांनराम गावडे) : आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशनच्या संस्थापक श्री पांडुरंग पारधी व राज्य सचिव श्री सिताराम गावंडा यांनी निरगुडी बु ठाकरवाडी ता खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांना सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान संघटनेच्या कार्याचा आढावा घेण्यासह आगामी काळात राबविण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम, आदिवासी समाजाचे प्रश्न आणि संघटनात्मक बळकटीकरण, आदिवासी समाजावर होणारे अन्याय, अत्याचार, वन विभागाचे अतिक्रमण यासंदर्भात चर्चा करण्यात आली.आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, समाजातील नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी तसेच समाजाच्या विविध समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी संघटनेने एकजुटीने कार्य करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.ग्रामीण आणि अतिदुर्गम भागातील आदिवासी ठाकर बांधवांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न करणे, शैक्षणिक प्रगतीला चालना देणे आणि समाजातील युवकांना संघटनात्मक कार्यात सहभागी करून घेणे, अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.या सदिच्छा भेटीमुळे स्थानिक पदाधिकाऱ्यांना , गावक-यांना संघटनेच्या पुढील कार्यासाठी प्रोत्साहन मिळाले. आदिवासी ठाकर समाजाच्या हक्कांसाठी, विकासासाठी आणि सामाजिक एकजुटीसाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे काम करण्याचा संदेश या भेटीतून देण्यात आला.

श्रीकृष्ण महाविद्यालयात रेड रिबीन क्लबची स्थापना

गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटनेच्या अनुसार राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आज नव्याने रेड रिबीन क्लबची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयातील युवकांमध्ये एचआयव्ही ,एड्स प्रतिबंध ,अमली पदार्थांचे सेवन रोखणे व व्यसनमुक्ती बाबत जनजागृती करण्यासाठी रेड रेबीन क्लबच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जातात. रेड रिबीन क्लबच्या अनेक उपक्रमातून नशा मुक्ती मित्र म्हणून विद्यार्थी प्रतिनिधीची नियुक्ती केली जाते आणि एक सशक्त राष्ट्र म्हणून नशा मुक्त राष्ट्र म्हणून आपल्याला उभे राहण्यासाठी या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातात. या नशा मुक्तमित्रांच्या सहाय्याने व्यसनमुक्ती, एचआयव्ही ,एड्स प्रतिबंध व शारीरिक आणि मानसिक आरोग्याबाबत जनजागृती संदर्भात विविध उपक्रम राबविण्याबाबत व्याख्याने, रॅली ,पोस्टर्स स्पर्धा, जलजागृती व जनजागृती कार्यक्रम राबवून त्यासंदर्भातील प्रतिज्ञा दिली जाते.या इत्यंभूत कार्यक्रमासंदर्भात श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक ,प्राध्यापकेतर सर्व कर्मचारी , विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ नोव्हेंबर २०२६

दुष्काळी अनुदानासाठी शेतकऱ्यांचा एल्गार; १० नोव्हेंबरला जळकोट तहसीलवर ठिय्या आंदोलनाचा इशारा

अतनुर (प्रा.सुधीर पंचगल्ले) : यंदाच्या खरीप हंगामात पावसाच्या अनियमितेमुळे आणि दीर्घ खंडामुळे जळकोट तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी डोंगराळ डोंगरी भागातील अतनूर पंचायत समिती गणातील अनेक गावांमध्ये वाडी तांडा वस्तीतील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेला घास हिरावल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. एकीकडे दिवाळी हा प्रकाशाचा सण जवळ आला असताना, दुसरीकडे जळकोट तालुक्यातील गायरान धारक व इतर शेतकऱ्यांच्या घरात दिवा लावायलाही पैसे नाहीत, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, तालुक्यातील सर्व पात्र गायरान धारक व इतर शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम दुष्काळी अनुदान त्वरित वितरित करावे; अन्यथा जळकोट तहसील कार्यालयासमोर 'कोरडी दिवाळी' साजरी करत १० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा समस्त शेतकऱ्यांच्या वतीने प्रशासनाला देण्यात आला आहे. या संदर्भात शेतकरी नेते अविनाश भाऊ तोगरे (धामणगाव) आणि माजी सरपंच संतोष बट्टेवाड (चिंचोली) अतनूरचे सामाजिक कार्यकर्ते ज्येष्ठ समाजसेवक दलितमित्र बी.जी.शिंदे यांच्या नेतृत्वाखाली समस्त गायरान धारक व इतर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांचे एक सविस्तर निवेदन जळकोटचे तहसीलदार यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री, महसूल मंत्री तसेच लातूरचे जिल्हाधिकारी आणि उदगीरचे उपविभागीय अधिकारी यांना सादर करण्यात आले आहे.तांत्रिक त्रुटींमुळे गायरान धारक शेतकरी अनुदानापासून वंचितनिवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रतिकूल हवामानामुळे जळकोट तालुक्यातील पिके पूर्णपणे वाया गेली आहेत. कुटुंबाचा उदरनिर्वाह, शेतीचा खर्च, कर्जाची परतफेड आणि मुलांचे शिक्षण कसे करावे, हा यक्षप्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. शासनाने दुष्काळी परिस्थितीमध्ये मदत जाहीर केली असली, तरी प्रत्यक्षात मात्र अनेक पात्र शेतकरी या मदतीपासून वंचित आहेत. विशेषतः अधिकृत सातबारा उतारा असलेले गायरान धारक शेतकरी ई-पीक पाहणी, अनुदान यादीत नाव नसणे अशा विविध तांत्रिक कारणांमुळे शासकीय मदतीपासून दूर राहिले आहेत. शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या १. जळकोट तालुक्यातील सर्व पात्र गायरान धारक व इतर शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम दुष्काळी अनुदान थेट बँक खात्यात जमा करावे., २. सातबारा उतारा व आठ-अ असलेल्या सर्व गायरान धारक शेतकऱ्यांचा दुष्काळी अनुदानाच्या यादीत तात्काळ समावेश करावा., ३. ई-पीक पाहणी न झालेल्या शेतांवर तलाठी व कृषी विभागामार्फत प्रत्यक्ष जाऊन तातडीने पीक पाहणी पूर्ण करावी., ४. अतिवृष्टी आणि पावसाच्या खंडामुळे झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई द्यावी., ५. अनुदानापासून वंचित राहिलेल्या प्रकरणांची विशेष तपासणी करून तांत्रिक त्रुटी दूर कराव्यात., ६. दुष्काळी अनुदानाच्या वितरणाबाबत प्रशासनाने स्पष्ट वेळापत्रक जाहीर करावे. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा पवित्रा शेतकऱ्यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर दिवाळीपूर्वी मागण्यांची पूर्तता झाली नाही, तर शासनाच्या या उदासीन धोरणाचा निषेध म्हणून शेतकरी तहसील कार्यालयासमोर कोरडी दिवाळी साजरी करतील. तसेच, दिनांक १० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता जळकोट तहसील कार्यालयासमोर शांततामय लोकशाही मार्गाने ठिय्या आंदोलन सुरू केले जाईल. जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर अविनाश भाऊ तोगरे, संतोष बट्टेवाड यांच्यासह पांडुरंग वाघमारे, प्रकाश निवृत्ती वाघमारे, बालाजी गोविंद वाघमारे, गंगाधर निवृत्ती वाघमारे, सतीश मारोती वाघमारे, शिवाजी लालू वाघमारे, विठ्ठल किसन वाघमारे, संग्राम माधव वाघमारे, धोंडिबा केरबा वाघमारे, शामराव निवृत्ती वाघमारे, दलितमित्र बी.जी.शिंदे, आणि जळकोट तालुक्यातील समस्त गायरान धारक व शेकडो शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने या निवेदाची प्रत जळकोट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनाही माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सह्याद्रीच्या रक्षणासाठी चिमुकल्याची मुख्यमंत्र्यांना साद

अतनुर (प्रा. सुधीर पंचगल्ले) आजच्या आधुनिक युगात विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर निसर्गाचा ऱ्हास होत असताना, लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी डोंगराळ डोंगरी भागातील अतनूर येथील एका शाळकरी विद्यार्थ्याने पर्यावरण संवर्धनाचा एक नवा आणि आदर्श वस्तुपाठ समाजासमोर घालून दिला आहे. येथील उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोकराव पाटील यांची नात व अतनूरचे नवतरुण युवा सरपंच चंद्रशेखर अशोकराव पाटील यांची कन्या येथील स्थानिक शाळेत इयत्ता सातवीत शिकणाऱ्या चि. सह्याद्री चंद्रशेखर पाटील याने सह्याद्री पर्वतरांगांमधील वाढती वृक्षतोड थांबवण्यासाठी थेट महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून साद घातली आहे. त्याच्या या धाडसी आणि संवेदनशील पावलाचे सध्या संपूर्ण राज्यभरातून मनःपूर्वक अभिनंदन आणि कौतुक केले जात आहे.पत्रातून मांडली सह्याद्रीची व्यथा!सह्याद्री पर्वतरांगा हा महाराष्ट्राचा अमूल्य नैसर्गिक वारसा असून, तेथील जैवविविधता धोक्यात आली आहे याकडे चि. सह्याद्री याने मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. "झाडे वाचवा, जैवविविधता जपा, सह्याद्री वाचवा आणि आपले भविष्य सुरक्षित करा!" असा कळकळीचा संदेश त्याने आपल्या पत्रातून दिला आहे. एका लहान विद्यार्थ्याने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भविष्यातील संकटांची जाणीव ठेवून घेतलेली ही भूमिका अत्यंत कौतुकास्पद ठरली आहे.छत्रपतींच्या महाराष्ट्रात एक नवी प्रेरणा...इतिहास साक्ष आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांनी नेहमीच निसर्ग आणि पर्यावरणाचे रक्षण केले. त्याच महाराष्ट्रात आज एका विद्यार्थ्याने सह्याद्रीच्या रक्षणासाठी आवाज उठवून आपल्यातील सामाजिक जाणीव आणि प्रगल्भता दाखवून दिली आहे. सह्याद्री पाटील याच्या या धाडसामुळे समाजातील इतर घटकांना, विशेषतः तरुण पिढीला आणि विद्यार्थ्यांना निसर्गसंवर्धनासाठी काम करण्याची एक नवी प्रेरणा मिळाली आहे.सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव!...चि. सह्याद्री पाटील याच्या या जनजागृतीच्या प्रयत्नांची दखल घेऊन पर्यावरणप्रेमी, शिक्षक आणि सामाजिक संस्थांकडून त्याचे जाहीर अभिनंदन करण्यात येत आहे. भविष्यातही त्याने अशाच प्रकारे समाजहितासाठी आणि निसर्गसंवर्धनासाठी आपले कार्य अखंड सुरू ठेवावे, अशा सदिच्छा त्याला दिल्या जात आहेत. लहान वयात निसर्गाविषयी एवढी मोठी संवेदनशीलता दाखवणारा सह्याद्री खऱ्या अर्थाने समाजासाठी मार्गदर्शक ठरला आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ नोव्हेंबर २०२६

भ्रष्टाचारमुक्त समाजासाठी नैतिक आचरण आणि कठोर कायद्याची गरज

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताह आयोजित केला जातो. यंदा हा सप्ताह २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत साजरा केला जात आहे. यावर्षीची संकल्पना 'सत्यनिष्ठा से समृद्धि' (Probity for Prosperity) अशी असून, प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांच्या आधारे समृद्ध समाज व राष्ट्रनिर्मिती करण्याचा संदेश या संकल्पनेतून दिला जातो. भ्रष्टाचार म्हणजे केवळ लाच घेणे किंवा देणे नव्हे, तर आपल्या कर्तव्याप्रती बेईमानी करणे, अधिकारांचा गैरवापर करणे, नियमांचे उल्लंघन करणे आणि सार्वजनिक हितापेक्षा वैयक्तिक स्वार्थाला प्राधान्य देणे, हीदेखील भ्रष्टाचाराचीच विविध रूपे आहेत. भ्रष्टाचारामुळे केवळ आर्थिक नुकसान होत नाही, तर प्रशासनावरील जनतेचा विश्वास कमी होतो, सामाजिक विषमता वाढते आणि न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होते. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणा, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नैतिकता ही मूल्ये अत्यंत महत्त्वाची आहेत. प्रत्येक नागरिकाने तसेच सार्वजनिक पदावर कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तीने आपली जबाबदारी निष्ठेने पार पाडली, तरच प्रशासन अधिक कार्यक्षम आणि समाज अधिक न्याय्य बनू शकतो. 'सत्यनिष्ठेतून समृद्धी' हा केवळ घोषवाक्यापुरता मर्यादित न राहता तो आपल्या वैयक्तिक आचरणाचा आणि सार्वजनिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला पाहिजे. भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि जबाबदार व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणाची कास धरून भ्रष्टाचाराविरुद्ध जागरूक राहणे, हीच या दक्षता जनजागृती सप्ताहाची खरी फलश्रुती ठरेल. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक गुन्हा नाही, तर तो समाजाच्या नैतिक, सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय व्यवस्थेला पोखरणारा गंभीर आजार आहे. समाजाच्या शरीराला लागलेला कॅन्सर जसा हळूहळू संपूर्ण शरीर कमकुवत करतो, त्याचप्रमाणे भ्रष्टाचार लोकशाहीच्या संस्थांना, विकासाच्या प्रक्रियेला आणि सामान्य माणसाच्या विश्वासाला आतून पोखरतो. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही मूल्ये दुर्बल झाली की भ्रष्टाचाराला पोषक वातावरण निर्माण होते. त्यामुळे भ्रष्टाचारमुक्त समाजाची निर्मिती करायची असेल, तर केवळ जनजागृती करून चालणार नाही; त्यासाठी नैतिक आचरणाची रुजवणूक आणि भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कठोर, निष्पक्ष व वेळेत कारवाई होणे आवश्यक आहे. भ्रष्टाचार : समाजाला लागलेला कॅन्सर भ्रष्टाचार म्हणजे सार्वजनिक पद, अधिकार किंवा जबाबदारीचा वैयक्तिक अथवा गटाच्या फायद्यासाठी गैरवापर करणे. लाच घेणे, सरकारी निधीचा अपहार करणे, कंत्राटांमध्ये अनियमितता करणे, नातेसंबंधांच्या आधारे लाभ मिळवून देणे, योजनांच्या अंमलबजावणीत गैरव्यवहार करणे आणि अधिकारांचा गैरवापर करणे ही त्याची विविध रूपे आहेत. भ्रष्टाचाराची सर्वाधिक झळ सामान्य नागरिकांना बसते. शासकीय कार्यालयात एखादे साधे काम करून घेण्यासाठी पैसे द्यावे लागत असतील, तर नागरिकांच्या मनात व्यवस्थेबद्दल अविश्वास निर्माण होतो. गरिबांना मिळणाऱ्या योजनांचा लाभ मध्येच हडप केला जात असेल, तर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाच तडा जातो. भ्रष्टाचारामुळे कायद्यापुढील समानतेचे तत्त्व कमकुवत होते आणि पैसा व प्रभाव असणाऱ्यांना विशेष संरक्षण मिळण्याची शक्यता वाढते. पैशाची हाव आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास भ्रष्टाचाराच्या मुळाशी केवळ गरिबी किंवा आर्थिक गरज नसते. अमर्याद पैसा मिळवण्याची इच्छा, सत्तेचा अहंकार, सामाजिक प्रतिष्ठेची चुकीची कल्पना, ऐषारामाची लालसा आणि अनैतिक मार्गाने मिळवलेल्या संपत्तीला समाजाकडून मिळणारी प्रतिष्ठा हीदेखील महत्त्वाची कारणे आहेत. आज अनेकदा व्यक्तीच्या चारित्र्यापेक्षा तिच्याकडे किती पैसा आहे, यावर तिचे सामाजिक स्थान ठरवले जाते. पैसा कसा मिळवला, तो कमावण्यासाठी कोणत्या मार्गांचा वापर केला आणि त्यामुळे समाजाचे किती नुकसान झाले, हे प्रश्न दुय्यम ठरतात. अनैतिक मार्गाने संपत्ती मिळवणाऱ्या व्यक्तींचा गौरव केला जात असेल, तर प्रामाणिकपणे जगणाऱ्यांच्या मूल्यांनाही धक्का बसतो. पैशाची हाव कमी करण्यासाठी कुटुंब, शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी नैतिक शिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे. प्रामाणिकपणा, सामाजिक जबाबदारी, संवेदनशीलता आणि सार्वजनिक संपत्तीबद्दल आदर या मूल्यांची जोपासना केली पाहिजे. मात्र, केवळ नैतिक उपदेश पुरेसा नाही. अनैतिक वर्तनातून फायदा मिळतो आणि त्यासाठी शिक्षा होत नाही, अशी परिस्थिती असेल तर नैतिक शिक्षणाचा प्रभाव मर्यादित राहतो. भ्रष्टाचारमुक्तीसाठी नैतिक आचरणाचे महत्त्व सार्वजनिक प्रशासनात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपले पद हे जनतेने पवलेले उत्तरदायित्व आहे, याची जाणीव ठेवली पाहिजे. सरकारी अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि सार्वजनिक संस्थांशी संबंधित व्यक्तींनी वैयक्तिक स्वार्थापेक्षा सार्वजनिक हिताला प्राधान्य दिले पाहिजे. नैतिक आचरण म्हणजे केवळ लाच न घेणे नव्हे. निर्णयप्रक्रियेत निष्पक्षता राखणे, नियमांचे पालन करणे, आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता ठेवणे, हितसंबंधांचा संघर्ष टाळणे आणि नागरिकांशी सन्मानाने वागणे यांचाही त्यात समावेश होतो. सार्वजनिक पदाचा वापर स्वतःच्या किंवा जवळच्या व्यक्तींच्या फायद्यासाठी करणे हे नैतिकतेच्या विरोधात आहे. प्रामाणिक व्यक्तींना संस्थात्मक संरक्षण मिळाले पाहिजे. भ्रष्टाचार उघड करणाऱ्या तक्रारदारांना आणि माहिती देणाऱ्यांना सुरक्षितता मिळाली, तर गैरव्यवहार उघड करण्याचे धैर्य वाढेल. नैतिक आचरणाला केवळ वैयक्तिक सद्गुण न मानता प्रशासकीय संस्कृतीचा अविभाज्य भाग बनवणे गरजेचे आहे. कठोर कारवाईचा अभाव आणि कायद्याच्या धाकाचा प्रश्नभ्रष्टाचार करणाऱ्यांवर वेळेत कारवाई होत नसेल, तर त्यांची हिंमत वाढण्याची शक्यता असते. एखाद्या व्यक्तीने गैरव्यवहार केला, त्याची तक्रार झाली, चौकशी झाली; परंतु वर्षानुवर्षे कोणताही ठोस निकाल लागला नाही, तर संबंधित व्यक्तीला कायद्याची भीती उरत नाही. उलट, भ्रष्टाचार करूनही सुटका होऊ शकते, असा संदेश इतरांपर्यंत पोहोचतो. काही ठिकाणी एकमेकांचे गैरव्यवहार झाकून घेण्याची, तक्रारींकडे दुर्लक्ष करण्याची आणि दोषींना वाचवण्याची प्रवृत्ती दिसून येते. अशा परस्पर संरक्षणामुळे भ्रष्टाचाराला संस्थात्मक आधार मिळू शकतो. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीबरोबरच त्याला मदत करणारे, पुरावे नष्ट करणारे किंवा चौकशीत अडथळे निर्माण करणारे यांच्यावरही कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. मात्र, कठोर कारवाई म्हणजे केवळ शिक्षा वाढवणे नव्हे. तक्रारींची निष्पक्ष चौकशी, पुराव्यांचे प्रभावी संकलन, स्वतंत्र तपास यंत्रणा, वेळेत न्यायालयीन प्रक्रिया आणि दोष सिद्ध झाल्यानंतर योग्य शिक्षा या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. निरपराध व्यक्तींना शिक्षा होऊ नये आणि दोषी व्यक्ती केवळ राजकीय किंवा प्रशासकीय प्रभावामुळे सुटू नयेत, याची काळजी घेतली पाहिजे. कायद्याचा धाक तेव्हाच निर्माण होतो, जेव्हा कायदा सर्वांना समान रीतीने लागू होतो. भ्रष्टाचाराचा विकासावर होणारा परिणाम भ्रष्टाचारामुळे देशाच्या विकासाची गती मंदावते. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक वाहतूक आणि ग्रामीण विकासासाठी मंजूर झालेल्या निधीचा अपव्यय ला, तर नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांचा दर्जा घसरतो. निकृष्ट दर्जाची कामे, अपूर्ण प्रकल्प आणि वाढलेला खर्च यांमुळे सार्वजनिक पैशाचे नुकसान होते. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा परिणाम विशेषतः गरीब आणि वंचित घटकांवर होतो. गरजू व्यक्तींना योजनांचा लाभ मिळत नाही, तर संसाधनांचे वाटप गरजेनुसार न होता प्रभाव आणि स्वार्थानुसार होण्याचा धोका वाढतो. भ्रष्टाचारामुळे गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि उद्योगांच्या वाढीवरही प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, नागरिकांचा शासनावरील विश्वास कमी होतो. लोकशाही केवळ निवडणुकांवर टिकत नाही; ती नागरिकांचा संस्थांवरील विश्वास, कायद्याचे राज्य आणि सार्वजनिक उत्तरदायित्व यांवरही टिकून असते. भ्रष्टाचार रोखण्यासाठी ठोस उपाययोजना भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी पुढील उपाय प्रभावीपणे राबवणे आवश्यक आहे. पहिले, शासकीय निर्णयप्रक्रिया पारदर्शक केली पाहिजे. सरकारी खरेदी, कंत्राटे, निधीचे वितरण आणि योजनांच्या खर्चाची माहिती नागरिकांना सहज उपलब्ध झाली पाहिजे. दुसरे, लाचलुचपत प्रतिबंधक यंत्रणांना स्वतंत्रपणे आणि प्रभावीपणे काम करता आले पाहिजे. तक्रारींची चौकशी वेळेत पूर्ण करून दोषींवर कायद्यानुसार कारवाई केली पाहिजे. तिसरे, सरकारी सेवांचे डिजिटलीकरण, ऑनलाइन अर्जप्रक्रिया, थेट लाभ हस्तांतरण आणि व्यवहारांची डिजिटल नोंद यांमुळे मध्यस्थांची भूमिका कमी होऊ शकते. मात्र, डिजिटल व्यवस्था पारदर्शक, सुरक्षित आणि सर्वसामान्यांना सहज वापरता येण्याजोगी असली पाहिजे. चौथे, माहितीचा अधिकार, सामाजिक लेखापरीक्षण आणि नागरिकांचा सहभाग अधिक प्रभावी केला पाहिजे. भ्रष्टाचाराची माहिती देणाऱ्या व्यक्तींना संरक्षण देणेही आवश्यक आहे. पाचवे, सार्वजनिक पदावरील व्यक्तींच्या निर्णयांची आणि आर्थिक व्यवहारांची योग्य तपासणी झाली पाहिजे. दोष सिद्ध झाल्यास पदाचा किंवा राजकीय प्रभावाचा विचार न करता कारवाई झाली पाहिजे. निष्कर्ष भ्रष्टाचारमुक्त समाज निर्माण करणे हे केवळ सरकारचे काम नाही; ती संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मात्र, या जबाबदारीचा अर्थ केवळ नागरिकांना प्रामाणिकपणाचे आवाहन करणे एवढाच नाही. सार्वजनिक संस्थांनी स्वतःच्या कारभारातून प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेचा आदर्श निर्माण केला पाहिजे. भ्रष्टाचार करणाऱ्यांना संरक्षण मिळत असेल, चौकशा लांबत असतील आणि दोषींना शिक्षा होत नसेल, तर भ्रष्टाचाराविरुद्धची लढाई कमकुवत होते. म्हणूनच नैतिक शिक्षण, पारदर्शक प्रशासन, स्वतंत्र तपास यंत्रणा, नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि दोषींवर वेळेत होणारी कठोर कारवाई यांची सांगड घालणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध केवळ भाषणे नव्हे, तर कृती आवश्यक आहे. प्रामाणिकपणाला संरक्षण, गैरव्यवहाराला प्रतिबंध आणि दोषींना कायद्यानुसार शिक्षा मिळाल्याशिवाय भ्रष्टाचारमुक्त समाजाचे स्वप्न साकार होणार नाही. कायद्याचा धाक, नैतिकतेचा पाया आणि जनतेच्या पैशाबद्दलची जबाबदारी या तीन गोष्टी सार्वजनिक जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या, तरच लोकशाही अधिक सक्षम, विकास अधिक न्याय्य आणि समाज अधिक विश्वासार्ह होऊ शकेल.

प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे
समाजशास्त्र विभाग,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,
जालना

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०१ नोव्हेबंर २०२६

सत्यनिष्ठेतून समृद्धीकडे : भ्रष्टाचारमुक्त समाजाची गरज- डॉ. राजेंद्र बगाटे

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक संपन्नतेइतकीच नैतिक संपन्नताही महत्त्वाची असते. एखाद्या देशाकडे आधुनिक तंत्रज्ञान, भक्कम पायाभूत सुविधा, उद्योगधंदे, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि कुशल मनुष्यबळ असले, तरी सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा नसेल, प्रशासनात पारदर्शकता नसेल आणि निर्णयप्रक्रियेत न्याय्यतेचा अभाव असेल, तर त्या देशाची प्रगती सर्वसमावेशक होऊ शकत नाही. भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून तो समाजातील विश्वास, समान संधी, न्याय आणि लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारा गंभीर प्रश्न आहे. सार्वजनिक पदावरील व्यक्तीने आपल्या अधिकारांचा वापर वैयक्तिक लाभासाठी करणे, नागरिकांच्या हक्कांमध्ये अडथळे निर्माण करणे किंवा सार्वजनिक निधीचा गैरवापर करणे, यामुळे संपूर्ण व्यवस्थेची विश्वासार्हता कमी होते. म्हणूनच सत्यनिष्ठा, सचोटी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही मूल्ये केवळ शासनव्यवस्थेतच नव्हे, तर समाजाच्या प्रत्येक स्तरावर रुजणे आवश्यक आहे.या पार्श्वभूमीवर भारतात दरवर्षी साजरा केला जाणारा दक्षता जनजागृती सप्ताह विशेष महत्त्व प्राप्त करतो. केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शनाखाली २०२६ मध्ये हा सप्ताह २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत देशभर साजरा केला जात आहे. यंदाची संकल्पना ‘सत्यनिष्ठेतून समृद्धी’ अशी आहे. या संकल्पनेतून प्रामाणिक आचरण, नैतिक मूल्ये आणि पारदर्शक प्रशासन यांच्या आधारे देशाची शाश्वत समृद्धी साधण्याचा संदेश दिला आहे. हा सप्ताह केवळ सरकारी कार्यालयांमध्ये शपथ घेणे, व्याख्याने आयोजित करणे किंवा जनजागृतीचे फलक लावणे एवढ्यापुरता मर्यादित राहता कामा नये. सार्वजनिक जीवनातील प्रत्येक घटकाने स्वतःच्या वर्तनाचे परीक्षण करून भ्रष्टाचाराला नकार देण्याची आणि प्रामाणिकपणाला स्वीकारण्याची ही संधी मानली पाहिजे.दक्षता जनजागृती सप्ताहाचा संबंध सार्वजनिक प्रशासनातील सचोटी आणि भ्रष्टाचार प्रतिबंधाच्या प्रयत्नांशी आहे. केंद्रीय दक्षता आयोगाची स्थापना १९६४ मध्ये करण्यात आली. पुढे केंद्रीय दक्षता आयोग अधिनियम, २००३ द्वारे आयोगाला वैधानिक दर्जा प्राप्त झाला. केंद्र सरकारच्या मंत्रालयांमध्ये, विभागांमध्ये आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांमध्ये दक्षता प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी आयोग मार्गदर्शन करतो. भ्रष्टाचारासंबंधी तक्रारींची दखल घेणे, दक्षता यंत्रणांच्या कार्याला दिशा देणे, प्रतिबंधात्मक उपाय सुचविणे आणि सार्वजनिक सेवांमध्ये नैतिक आचरणाला प्रोत्साहन देणे ही त्याच्या कार्याची महत्त्वाची क्षेत्रे आहेत. दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या आठवड्यात हा सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनातील सचोटी आणि कर्तव्यनिष्ठेचे महत्त्व अधोरेखित करणे हा या आयोजनामागील व्यापक हेतू आहे.भ्रष्टाचाराची व्याप्ती केवळ लाच घेणे किंवा देणे एवढी मर्यादित नाही. सार्वजनिक अधिकारांचा गैरवापर करून अनुचित लाभ मिळविणे, सरकारी निधीचा अपहार करणे, निविदा प्रक्रियेत संगनमत करणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय लाभ मिळविणे, पात्र व्यक्तींना डावलून अपात्र व्यक्तींना लाभ देणे, पदाचा प्रभाव वापरून नियमबाह्य निर्णय घेणे किंवा सार्वजनिक मालमत्तेचा वैयक्तिक कारणांसाठी वापर करणे, हीदेखील भ्रष्टाचाराची विविध रूपे आहेत. काही गैरप्रकार उघडपणे घडतात, तर काही प्रशासकीय प्रक्रियेतील गुंतागुंत, निर्णयांमधील पक्षपात आणि नियमांच्या संदिग्धतेमुळे घडतात. अनेकदा भ्रष्टाचाराला समाजातील काही घटकांकडून मूक संमती मिळते. ‘काम लवकर व्हावे म्हणून पैसे द्यावे लागतात’, ‘ओळख असल्याशिवाय काम होत नाही’ किंवा ‘नियमांपेक्षा व्यवहार महत्त्वाचा’ अशी मानसिकता भ्रष्टाचाराला खतपाणी घालते. ही मानसिकता बदलल्याशिवाय भ्रष्टाचारमुक्त समाजाची निर्मिती होणे कठीण आहे.भ्रष्टाचाराचे परिणाम सर्व समाजघटकांना जाणवतात; मात्र त्याचा सर्वाधिक फटका गरीब, वंचित, ग्रामीण आणि दुर्बल घटकांना बसतो. शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी नागरिकांना अनावश्यक अडथळ्यांचा सामना करावा लागला, तर योजनांचा मूळ उद्देशच निष्फळ ठरतो. रेशन, घरकुल, शिष्यवृत्ती, रोजगार हमी, आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा आणि शैक्षणिक प्रवेश यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागणे, कागदपत्रांच्या नावाखाली अडवणूक होणे किंवा अनधिकृत पैसे मागितले जाणे ही गंभीर बाब आहे. ज्या व्यक्तीला शासनाकडून मदत मिळणे अपेक्षित आहे, तिलाच आपला हक्क मिळविण्यासाठी अतिरिक्त आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असेल, तर ते सुशासनाचे लक्षण नाही. भ्रष्टाचारामुळे सार्वजनिक सेवांचा खर्च वाढतो, विकासकामांची गुणवत्ता कमी होते आणि समाजातील विषमता अधिक तीव्र होते.महाराष्ट्राच्या संदर्भात भ्रष्टाचारविरोधी जागरूकतेची गरज अधिक व्यापक आहे. राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागात विविध शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे आणि सार्वजनिक संस्था नागरिकांना सेवा पुरवितात. ग्रामपंचायतीपासून महानगरपालिकेपर्यंत पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, सिंचन, घरकुल आणि रोजगार यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक निधी खर्च होतो. या निधीचा योग्य वापर झाला, तर नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकते. परंतु कामे कागदावर पूर्ण दाखविणे, निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणे, लाभार्थी निवडीत पक्षपात करणे किंवा मंजूर निधीचा गैरवापर करणे यामुळे विकासाच्या संधी हिरावल्या जातात. विशेषतः दुष्काळी आणि ग्रामीण भागात पाणीपुरवठा, जलसंधारण, शेतीसंबंधित योजना आणि रोजगाराच्या कामांमध्ये पारदर्शकता असणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक निधीचा अपव्यय म्हणजे नागरिकांच्या विकासाच्या हक्कावरच घाला होय.स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे हा भ्रष्टाचार प्रतिबंधाचा प्रभावी मार्ग आहे. ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाहीची महत्त्वाची संस्था असून गावाच्या विकासाशी संबंधित निर्णयांमध्ये नागरिकांना सहभागी होण्याची संधी देते. ग्रामसभेत विकासकामांचे नियोजन, निधीचा वापर, लाभार्थी निवड, कामांची गुणवत्ता आणि योजनांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा झाली पाहिजे. ग्रामपंचायतीने मंजूर कामांची माहिती, खर्चाचा तपशील आणि कामांची सद्यस्थिती नागरिकांसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे. महिला बचतगट, युवक मंडळे, शेतकरी गट आणि सामाजिक संस्थांनीही सार्वजनिक कामांवर लक्ष ठेवावे. सामाजिक लेखापरीक्षणाच्या माध्यमातून योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि कागदोपत्री नोंदी यांची तुलना करता येते. लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या प्रश्नांकडे विरोध म्हणून न पाहता लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे.दक्षता म्हणजे गैरव्यवहार घडल्यानंतर चौकशी करणे एवढेच नव्हे, तर गैरव्यवहार घडण्याची शक्यता निर्माण करणाऱ्या त्रुटी आधीच दूर करणे होय. यालाच प्रतिबंधात्मक दक्षता म्हणतात. प्रशासनातील अनावश्यक प्रक्रिया, अस्पष्ट नियम, कामकाजातील विलंब, अधिकारांचा अवाजवी वापर आणि निर्णयप्रक्रियेतील अपारदर्शकता यांमुळे भ्रष्टाचाराला संधी मिळते. नागरिकांना एखादे काम करण्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, किती शुल्क भरावे लागेल, किती दिवसांत काम पूर्ण होईल आणि विलंब झाल्यास तक्रार कुठे करावी, याची स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे. कार्यालयीन कामकाजात जबाबदारी निश्चित करणे, सेवा देण्यासाठी कालमर्यादा ठरविणे, तक्रारींचा नियमित आढावा घेणे आणि कामकाजाचे लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. भ्रष्टाचार होऊ नये अशी व्यवस्था निर्माण करणे हे भ्रष्टाचार झाल्यानंतर कारवाई करण्याइतकेच महत्त्वाचे आहे.यंदाच्या सप्ताहाच्या अनुषंगाने केंद्रीय दक्षता आयोगाने १७ ऑगस्ट ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत तीन महिन्यांची प्रतिबंधात्मक दक्षता मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेत प्रलंबित तक्रारींचा निपटारा, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, अधिकारी व कर्मचाऱ्यांची क्षमता वृद्धी, डिजिटल उपक्रम आणि कंत्राट व्यवस्थापन या पाच क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. क्षमता वृद्धीच्या अंतर्गत माहिती तंत्रज्ञान व सायबर सुरक्षितता, सार्वजनिक खरेदी, सरकारी ई-बाजारपेठेतील नव्या सुविधा, आचरणविषयक नियम आणि हितसंबंधांचा संघर्ष यांसारख्या विषयांवर प्रशिक्षण देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या मोहिमेचा उद्देश केवळ तक्रारींची संख्या कमी करणे नसून दक्षता प्रशासनाची कार्यक्षमता वाढविणे हा आहे. तक्रारींचा वेळेत निपटारा झाल्यास नागरिकांचा विश्वास वाढतो, तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण मिळाल्यास नियमबद्ध व जबाबदार निर्णयप्रक्रिया विकसित होते.माहिती तंत्रज्ञानामुळे भ्रष्टाचार प्रतिबंधासाठी अनेक नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. शासकीय सेवांचे संगणकीकरण, ऑनलाइन अर्जप्रक्रिया, ई-निविदा, डिजिटल देयके, थेट लाभ हस्तांतरण आणि ऑनलाइन तक्रार निवारण यांमुळे नागरिकांचा कार्यालयीन फेऱ्यांवरील अवलंब कमी होऊ शकतो. शासकीय खरेदीसाठी ई-खरेदी व्यवस्था आणि सरकारी ई-बाजारपेठ यांचा वापर केल्यास खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता वाढविण्यास मदत होते. डिजिटल नोंदींमुळे व्यवहारांचा मागोवा घेता येतो आणि निर्णयप्रक्रियेतील अनियमितता शोधणे सोपे होते. तथापि, तंत्रज्ञान हा भ्रष्टाचाराचा आपोआप नाश करणारा उपाय नाही. डिजिटल व्यवस्थेतही बनावट नोंदी, संगनमत, माहितीचा गैरवापर आणि सायबर गुन्हे घडू शकतात. म्हणूनच माहितीची सुरक्षितता, नियमित तांत्रिक तपासणी, नागरिकांना डिजिटल साक्षरता आणि प्रणालींचे उत्तरदायित्व यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.सार्वजनिक कंत्राटे आणि खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखणे हेही दक्षता प्रशासनाचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. रस्ते, पूल, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा योजना आणि इतर सार्वजनिक कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जातो. निविदेच्या अटी विशिष्ट कंत्राटदाराच्या फायद्यासाठी तयार करणे, स्पर्धा मर्यादित करणे, संगनमताने दर निश्चित करणे, प्रत्यक्ष कामापेक्षा अधिक खर्च दाखविणे किंवा निकृष्ट दर्जाचे काम स्वीकारणे यामुळे सार्वजनिक पैशाचे नुकसान होते. कंत्राट प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा नियमबद्ध आणि तपासण्यायोग्य असला पाहिजे. कामाची गुणवत्ता स्वतंत्रपणे तपासली पाहिजे. काम पूर्ण झाल्यानंतर कागदोपत्री प्रमाणपत्राबरोबरच प्रत्यक्ष पडताळणी झाली पाहिजे. कंत्राटदार, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक निधी हा जनतेच्या मालकीचा आहे, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.भ्रष्टाचारविरोधी लढ्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरिकांसाठी प्रभावी साधन आहे. या कायद्यामुळे नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांकडून माहिती मागण्याचा अधिकार मिळाला आहे. शासकीय निर्णय, निधीचा वापर, विकासकामे, निविदा, लाभार्थी निवड आणि प्रशासकीय कार्यवाही यांसंबंधी माहिती मिळवून नागरिक व्यवस्थेचे परीक्षण करू शकतात. माहितीचा अधिकार हा केवळ कागदपत्रे मिळविण्याचा मार्ग नसून प्रशासनाला उत्तरदायी बनविण्याचे लोकशाही साधन आहे. मात्र, प्रत्येक माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना स्वतंत्र अर्ज करावा लागू नये. शासकीय कार्यालयांनी महत्त्वाची माहिती नियमितपणे स्वतःहून प्रसिद्ध केली पाहिजे. निर्णयांची कारणे स्पष्ट असावीत आणि तक्रार निवारणाची व्यवस्था सहज उपलब्ध असावी. माहितीचा अधिकार वापरताना नागरिकांनी तथ्याधारित प्रश्न विचारणे आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणेही महत्त्वाचे आहे.भ्रष्टाचार उघड करणाऱ्या व्यक्तींचे संरक्षण करणे ही लोकशाही व्यवस्थेची महत्त्वाची जबाबदारी आहे. अनेक वेळा गैरव्यवहाराची माहिती असलेल्या व्यक्तींना तक्रार केल्यास बदली, दबाव, छळ किंवा अन्य प्रतिकूल परिणामांना सामोरे जावे लागेल, अशी भीती वाटते. त्यामुळे तक्रारदारांची ओळख आणि सुरक्षितता जपणे, तक्रारींची निष्पक्ष चौकशी करणे आणि सूडबुद्धीने होणाऱ्या कारवाईपासून संरक्षण देणे आवश्यक आहे. केंद्र शासनाशी संबंधित आणि केंद्रीय दक्षता आयोगाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या प्रकरणांसाठी आयोगाच्या निर्धारित प्रक्रियेचा उपयोग करता येतो. राज्य शासनाशी संबंधित प्रकरणांसाठी राज्यातील सक्षम दक्षता यंत्रणा किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करता येते. तक्रार करताना पुरावे, कागदपत्रे आणि घटनांचा तपशील अचूक देणे आवश्यक आहे. वैयक्तिक वैरातून केलेले आरोप किंवा अप्रमाणित माहिती प्रसारित करणे टाळले पाहिजे.भ्रष्टाचार रोखण्याची जबाबदारी केवळ शासन आणि प्रशासनाची नाही. नागरिकांच्या दैनंदिन वर्तनातूनही प्रामाणिक सार्वजनिक संस्कृती निर्माण होते. स्वतःचे काम लवकर व्हावे म्हणून नियमबाह्य मार्ग स्वीकारणे, ओळखीचा वापर करून अनुचित लाभ मिळविणे, पात्रता नसतानाही शासकीय योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न करणे किंवा लाच देऊन काम करून घेणे या कृती भ्रष्ट व्यवस्थेला बळ देतात. त्यामुळे भ्रष्टाचाराविरोधात बोलताना स्वतःच्या वर्तनाचेही परीक्षण करणे आवश्यक आहे. अधिकृत शुल्क भरणे, पावती घेणे, नियमांचे पालन करणे, चुकीच्या मागण्यांना नकार देणे आणि आवश्यकतेनुसार सक्षम यंत्रणेकडे तक्रार करणे ही जबाबदार नागरिकांची कर्तव्ये आहेत. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, कर भरणे आणि सार्वजनिक नियमांचे पालन करणे यांमधूनही सामाजिक प्रामाणिकपणा व्यक्त होतो.शिक्षणसंस्था आणि युवकांची भूमिका भ्रष्टाचारमुक्त समाजनिर्मितीत अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, न्याय, समता, सार्वजनिक हित आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची जाणीव करून दिली पाहिजे. निबंध, वक्तृत्व, चर्चासत्रे, प्रश्नमंजुषा आणि जनजागृती उपक्रमांद्वारे भ्रष्टाचाराचे परिणाम समजावून सांगता येतात. परीक्षेत गैरप्रकार न करणे, संशोधनात साहित्यचौर्य टाळणे, शैक्षणिक कामात पारदर्शकता राखणे आणि संस्थात्मक नियमांचे पालन करणे यांपासून सचोटीची सुरुवात होते. युवक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून शासकीय योजनांची माहिती मिळवू शकतात, सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न विचारू शकतात आणि ऑनलाइन तक्रार यंत्रणांचा जबाबदारीने उपयोग करू शकतात. मात्र, समाजमाध्यमांवर अप्रमाणित आरोप किंवा चुकीची माहिती पसरविण्याऐवजी तथ्यांची पडताळणी करूनच जनजागृती करणे आवश्यक आहे.महिला बचतगट, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही भ्रष्टाचारविरोधी जनजागृतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. ग्रामीण भागातील महिला बचतगट हे केवळ आर्थिक व्यवहारांचे व्यासपीठ नसून सामाजिक जागरूकता आणि सामूहिक निर्णयक्षमतेचे माध्यम बनू शकतात. सार्वजनिक वितरण व्यवस्था, पाणीपुरवठा, शाळांमधील सुविधा, आरोग्यसेवा आणि स्थानिक विकासकामांबाबत महिला संघटितपणे प्रश्न उपस्थित करू शकतात. स्वयंसेवी संस्थांनी नागरिकांना कायदेशीर अधिकारांची माहिती द्यावी, तक्रार नोंदविण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करावे आणि प्रशासनाशी रचनात्मक संवाद साधावा. भ्रष्टाचारविरोधी चळवळ ही केवळ दोष दाखविणारी न राहता चांगल्या प्रशासनासाठी लोकसहभाग वाढविणारी असली पाहिजे.भ्रष्टाचाराचे आर्थिक परिणामही दूरगामी असतात. सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्यास शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेती, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांसाठी उपलब्ध असलेली साधने कमी पडतात. निकृष्ट दर्जाची कामे झाल्यास त्यांच्या दुरुस्तीसाठी पुन्हा सार्वजनिक पैसा खर्च करावा लागतो. उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रात लाचलुचपत किंवा पक्षपात वाढल्यास प्रामाणिक उद्योजकांचा उत्साह कमी होतो आणि समान स्पर्धेचे वातावरण बाधित होते. याउलट, नियमांची स्पष्टता, समान संधी, पारदर्शक निर्णयप्रक्रिया आणि विश्वासार्ह संस्था यांमुळे आर्थिक व्यवहारांना स्थैर्य मिळते. सार्वजनिक निधीचा योग्य वापर झाल्यास विकासाचे लाभ अधिक व्यापक समाजघटकांपर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे सत्यनिष्ठा ही केवळ वैयक्तिक नैतिकता नसून शाश्वत आर्थिक समृद्धीची आवश्यक अट आहे.यंदाच्या सप्ताहात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून परिवर्तन घडविण्याच्या संकल्पनेलाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी केंद्रीय दक्षता आयोगाच्या वतीने ‘तंत्रज्ञानाद्वारे परिवर्तन’ या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती विश्लेषण, डिजिटल नोंदी आणि स्वयंचलित प्रणाली यांच्या साहाय्याने व्यवहारांमधील अनियमितता शोधणे, प्रक्रियेतील विलंब कमी करणे आणि दक्षता प्रशासन अधिक परिणामकारक करणे शक्य होऊ शकते. तथापि, तंत्रज्ञानाचा वापर करताना नागरिकांच्या वैयक्तिक माहितीची गोपनीयता, माहितीची सुरक्षितता आणि संगणकीय प्रणालींमधील संभाव्य पक्षपात यांची काळजी घेणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्याचे साधन असले पाहिजे; ते उत्तरदायित्व टाळण्याचे माध्यम बनता कामा नये.भ्रष्टाचारमुक्त समाज घडविण्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि नैतिक मूल्यांची जपणूक या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ आणि त्यातील २०१८ मधील सुधारणा यांद्वारे लाचलुचपत व भ्रष्ट आचरणाविरुद्ध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. मात्र, कायदे अस्तित्वात असणे पुरेसे नाही; त्यांची निष्पक्ष आणि परिणामकारक अंमलबजावणी होणेही आवश्यक आहे. तपास यंत्रणांनी पुराव्यांच्या आधारे चौकशी करावी, दोषींवर कायद्यानुसार कारवाई करावी आणि निरपराध व्यक्तींना अन्यायकारक त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. सार्वजनिक पदांवरील व्यक्तींनी हितसंबंधांचा संघर्ष टाळावा, निर्णयांमध्ये निष्पक्षता राखावी आणि वैयक्तिक लाभापेक्षा सार्वजनिक हिताला प्राधान्य द्यावे. कायद्याचे राज्य टिकविण्यासाठी सर्वांना समान नियम लागू असणे ही लोकशाहीची मूलभूत अट आहे.दक्षता जनजागृती सप्ताहाचा खरा अर्थ सप्ताह संपल्यानंतरही त्यातील मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात टिकवून ठेवण्यात आहे. २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर हा कालावधी जनजागृतीसाठी महत्त्वाचा असला, तरी सत्यनिष्ठेचे पालन वर्षातील प्रत्येक दिवशी झाले पाहिजे. सरकारी कार्यालयांपासून ग्रामपंचायतीपर्यंत, शैक्षणिक संस्थांपासून उद्योगव्यवसायापर्यंत आणि सार्वजनिक जीवनापासून वैयक्तिक व्यवहारांपर्यंत पारदर्शकता व उत्तरदायित्वाची संस्कृती रुजली पाहिजे. भ्रष्टाचाराविरोधात केवळ घोषणा देण्याऐवजी त्याला पोषक असलेल्या सवयी, पद्धती आणि मानसिकता बदलण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून सुरुवात केली, प्रत्येक संस्थेने आपली जबाबदारी स्वीकारली आणि प्रत्येक सार्वजनिक पदावरील व्यक्तीने अधिकारांचा वापर जनहितासाठी केला, तर परिवर्तन शक्य आहे.‘सत्यनिष्ठेतून समृद्धी’ ही संकल्पना भारताच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग दाखविणारी आहे. समृद्धीचा अर्थ केवळ संपत्तीची वाढ नसून न्याय्य संधी, गुणवत्तापूर्ण सार्वजनिक सेवा, सामाजिक सुरक्षितता, विश्वासार्ह प्रशासन आणि सन्मानाने जगण्याची हमी असा व्यापक आहे. भ्रष्टाचारामुळे विकासाचे लाभ काही मोजक्या व्यक्तींपर्यंत मर्यादित राहतात; तर प्रामाणिक आणि पारदर्शक व्यवस्थेमुळे त्यांचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचू शकतो. म्हणूनच भ्रष्टाचारमुक्त भारताची निर्मिती ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामूहिक ध्येय असले पाहिजे. दक्षता जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने आपण प्रामाणिकपणाचा संकल्प करूया, चुकीच्या व्यवहारांना प्रोत्साहन देणार नाही, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करू आणि अन्यायाविरुद्ध कायदेशीर मार्गाने आवाज उठवूया. कारण ज्या समाजात सत्यनिष्ठा ही व्यक्तीची ओळख आणि प्रशासनाचा स्वभाव बनते, त्याच समाजात विश्वास, न्याय आणि समृद्धीची भक्कम पायाभरणी होते.

डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल — bagate.rajendra5@gmail.com